## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. ८ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठास मे. कृष्णा पेक्टींसचे संचालक डॉ. के.सी. पाटील यांचेकडून सहा लाख रूपयांचा धनादेश सुवर्णपदकांसाठी वाढीव निधी म्हणून कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांचेकडे आज दि. ८ ऑगस्ट रोजी सुपूर्द केला.

विद्यापीठाने दि. २३ फेब्रुवारी रोजी विद्यापीठ स्नेहसोबती मेळावा आयोजित केला होता या मेळाव्यात विद्यापीठाने विविध सुवर्णपदकांसाठी निधी दिलेल्या देणगीदारांना निधी वाढवून देणेबाबत आवाहन करण्यात आले होते. या आवाहनास प्रतिसाद देत मे. कृष्णा पेक्टींसचे संचालक डॉ. के.सी. पाटील यांनी कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून (सीएसआर) त्यांचेकडून यापूर्वी विद्यापीठास बी.टेक. (फूडस्, ऑईल फॅटस् ॲण्ड व्हॅक्सेस, प्लॅस्टीक्स, पेंटस् टेक्नॉलॉजी व केमिकल इंजिनिअरींग) या चार अभ्यासक्रमातील प्रथम येणाऱ्यास सुवर्णपदकांसाठी दिलेल्या देणगी रक्कमेत वाढ करून दिली आहे. त्यांनी दिलेल्या या भरीव योगदानामुळे ही चार सुवर्णपदके देणे विद्यापीठास सोयीचे होणार आहे. यावेळी प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील व उपवित्त व लेखाधिकारी एस.आर. गोहिल उपस्थित होते.

........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: ८ ऑगस्ट, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. ८ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रात 'जागतिक आदिवासी दिन' साजरा करण्यात आला.

या कार्यक्रम प्रसंगी प्रशाळेतील विद्यार्थ्यांनी आदिवासी वेशभूषा परिधान करून सहभाग नोंदविला. या कार्यक्रमात माधवी प्रधान प्रथम वर्ष हिंदी या विषयाच्या विद्यार्थिनीने वाहरू सोनवणे यांची स्टेज ही कविता सादर करून उपस्थितांमध्ये आदिवासींची सामाजिक बाजू मांडली. सुवर्णा पाटील प्रथम वर्ष हिंदी या विषयाच्या विद्यार्थिनीने जागतिक आदिवासी दिनाची माहिती दिली. प्रथम वर्ष मराठी या विषयाचा विद्यार्थी स्वप्निल जाधव याने आदिवासी दिवस साजरा करण्याचे महत्त्व सांगत मानवी हक्कांना संरक्षण देण्याच्या हेतूने हा दिवस साजरा केला जातो असे सांगितले. अर्जुन पावरा या विद्यार्थ्याने पावरा आदिवासी समुदायाविषयीची माहिती दिली. गुलाबसिंग पटले या विद्यार्थ्याने आदिवासी भिल्लसमाजाचे सण-उत्सव याविषयीची माहिती दिली. अनुष्का पवार या विद्यार्थिनीने सातपुडा परिसरातील आदिवासींचे सण-उत्सव, लग्न, रीतीरीवाज याविषयी माहिती देत भोंगऱ्या बाजाराचे आदिवासी संस्कृतीतील महत्त्व सांगितले. गायत्री वळवी या विद्यार्थिनीने नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी बोलीतून भाषिक संवाद साधून आदिवासी लग्नविधी विषयक बोलणी तसेच लग्न समारंभ पार पाडण्याच्या विधीचे सविस्तर वर्णन केले. या वर्णनाचा अनुष्का पवार या विद्यार्थिनीने मराठीतून अनुवाद सादर केला. संशोधक विद्यार्थी महेश सूर्यवंशी यांनी कवी संतोष पावरा यांची आदिम संस्कृती विषयीची कविता सादर केली. इंग्रजी विषयाचे सहाय्यक प्राध्यापक कृष्णा संदानशिव यांनी दलित आणि आदिवासी चळवळीतील क्रांतीगीत सादर केले. हिंदी विषयाच्या सहाय्यक प्राध्यापिका स्नेहा गायकवाड यांनी आदिवासी संस्कृती आणि आदिवासींचा वारसा याविषयी माहिती देत आदिवासी भिल्ल समाजाचे सामाजिक आणि सांस्कृतिक रितीरिवाज याविषयी माहिती दिली.

अध्यक्षीय मनोगतात भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्राचे संचालक प्रा.डॉ.म.सु.पगारे यांनी आदिवासी त्यात जे शिक्षणापासून सोयी सुविधांपासून सामाजिक, आर्थिक गरजांपासून वंचित आहेत, ज्या सर्वांना आदिम जीवन जगण्यासाठी भाग पाडले जात आहे ते सर्व आदिवासी या व्याख्येत गणले पाहिजे असे निर्देशित केले. तरी आदिवासींनी केवळ फक्त पारंपरिक संस्कृतीला चिकटून न राहता शिक्षणाची ओढ धरावी. शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात यावे. तेव्हाच अखिल मानव समूहाचे कल्याण साध्य होऊ शकते.

या कार्यक्रमासाठी भाषा अभ्यास प्रशाळेतील प्राध्यापक डॉ. दीपक खरात, डॉ. सुदर्शन भवरे, डॉ. प्रीती सोनी, कृष्णा संदानशिव, भारती सोनवणे, प्रतिभा गलवाडे, स्नेहा गायकवाड, शिक्षकेतर कर्मचारी चंद्रकांत बिऱ्हाडे तसेच मराठी, हिंदी, इंग्रजी विषयाचे विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन संशोधक विद्यार्थी खेमराज पाटील यांनी केले.

..........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: ८ ऑगस्ट, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता